**संक्षिप्त फौजदारी खटला क्रमांक ११/२०२३**
**निशाणी ५१ पुढे सुरू**

**<u>आरोपीतर्फे साक्षीदार क्रमांक– ०१</u>**

मी याद्वारे शपथेवर कथन करते की,

**माझे नाव : रवि भरत जाधव,**
**वय – ४० वर्षे, धंदा – शेती,**
**रा. कवठा केज तांडा, ता. औसा, जि. लातूर.**

**<u>उलटतपास फिर्यादीतर्फे वकील श्री. एस. सी. बिराजदार यांचेमार्फत :–</u>**

**०६.** हे म्हणणे खरे आहे की, फिर्यादीला मी ओळखतो. हे म्हणणे खरे आहे की, मी मुकादम म्हणुन काम करतो. हे म्हणणे खरे नाही की, मजूरांना पैसे देण्यासाठी हातउसने पैसे मी घेवून जात असे. हे म्हणणे खरे नाही की, मार्च २०२१ मध्ये मी कौटूंबीक गरजेसाठी फिर्यादीकडून चार लाख रुपये नेले होते. हे म्हणणे खरे नाही की, सदर रक्कम सहा महिन्यांमध्ये परत करतो असा वायदा केला होता. हे म्हणणे खरे नाही की, सदरच्या घेतलेल्या रकमेपोटी मी वादातील निशाणी ३३ वरील चेक दिला होता. हे म्हणणे खरे नाही की, सदरचा चेक न वटता परत आला होता. हे म्हणणे खरे आहे की, आरोपीने मला नोटीस पाठविली होती. हे म्हणणे खरे आहे की, सदरच्या नोटीसला उत्तरी नोटीस पाठविली नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझा देवानंद सोबत चार लाखाचा व्यवहार होता व तो देणे लागु नये म्हणून मी नोटीसला उत्तर दिले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, माझी व फिर्यादीची ओळख बलभीम गोरे याने करुन दिली होती. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादी हा सावकारी व्यवसाय करीत नाही. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादी सावकारी व्यवसाय करतो व त्याच्या कडून एक लाख रुपये पाच टक्के व्याजाने घेतल्याची बाब मी खोटी नमुद केली आहे.

**०७.** हे म्हणणे खरे नाही की, त्या देणेपोटी मी वादातील चेक दिला नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, मी शिवकुमार नगराळेकडे काम केले नव्हते व त्याचे येणारे पेमेंन्ट हे शिवकुमार याने चेकने फिर्यादीला दिले नव्हते. मी

शिवकुमारने फिर्यादीला पैसे दिल्याबद्दल तपशील दाखल करु शकतो. हे म्हणणे खरे आहे की, मी फिर्यादीला ७० हजार रोखीने दिल्याबद्दल पावती तयार करुन घेतली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी फिर्यादीला ७० हजार रुपये दिले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, माझे व फिर्यादीमध्ये एक लाख रुपये देणे घेणेचा व्यवहार झाला नव्हता.

**०८.** मी बॅंकेला फेब्रुवारी २०१६ मध्ये चेकबुक गहाळ झाल्याविषयी अर्जाने कळविले होते. सदरचे कागदपत्र मी दाखल केले नाहीत. माझे दहा चेक असलेले चेकबुक हरविले आहे, परंतू मला सदरचे चेकचे अनुक्रमांक माहित नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, माझे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅंक लातूर चे खाते सुरु आहे. दिनांक ०२.०२.२०१६ रोजी स्टॉप पेमेन्ट हे चेकबुक हरविल्यामुळे झाले होते.

**०९.** हे म्हणणे खरे आहे की, दिनांक ०५.०७.२०१६ रोजी बॅंकेने मला नविन चेकबुक दिले होते. हे म्हणणे खरे नाही की, माझे व आरोपीमधील व्यवहार सन २०२१ मधील आहे. हे म्हणणे खरे नाही की, पाठीमागिल एक लाख रुपयाच्या व्यवहारासाठी दिलेल्या माझया चेकचा फिर्यादीने गैरवापर केला नाही. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादीने माझेकडून अतिरिक्त पैसे मिळविण्यासाठी खोटी केस दाखल केली नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझया सरतपासातील मजकूर मी खोटा नमुद केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, आजरोजी मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास संपला,**

**फेरतपास नाही.**

**श्रवणोत्तर स्वीकृती**

Digitally signed by PARAG PHADNIS AWATE
Date: 2025.07.04 17:16:20 +0530

**दि. ०४/०७/२०२५**

**(श्री. आवटे पी. पी.)**
**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, औसा.**